थोडक्यात महत्त्वाचे

कुरुंदवाड पोलिसांना निवेदन देताना भीमशक्ती सामाजिक संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष रामदास मधाळे व अन्य पदाधिकारी.

'राहूल गांधी यांच्याबद्दल बेताल वक्तव्य करणाऱ्यास अटक करा, अन्यथा आंदोलन'

केसरी वृत्तसेवा

कुरुंदवाड : संसदेतील विरोधी पक्ष नेते व काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांच्याबद्दल बेताल वक्तव्य करणाऱ्या शिवसेना (शिंदे गट) आमदार संजय गायकवाड यांच्यावर कायदेशीर गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करावी; अन्यथा लोकशाही मार्गाने गाव बंद, रस्ता रोको, उपोषण असे आंदोलन केले जाईल, असा इशारा भीमशक्ती सामाजिक संघटना पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष ज्येष्ठ नेते रामदास मधाळे यांनी येथील पोलीस ठाण्यात निवेदनाद्वारे दिला आहे. निवेदनात, लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांच्याबद्दल आमदार संजय गायकवाड यांनी समाजामध्ये अशांतता निर्माण होईल, असे बेजबाबदार व्यक्तव्य केले आहे. त्याबद्दल त्यांच्यावर गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करावी, अन्यथा रस्ता रोको, उपोषण अशा स्वरूपाची आंदोलने करू, असे नमूद केले आहे. यावेळी रावसाहेब पाटील, नरेश कुरणे, उत्तम शिकलगार, तुषार कांबळे, तौफिक झांजे, जम्बो जमादार, पांडुरंग गायकवाड, शाहिद आवटी व कार्यकर्ते उपस्थित होते.

कोल्हापूर येथे जानू झोरे यांचा सत्कार करताना शाहूपुरी पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी.

५० हजार रुपयांनी भरलेली बॅग परत, चहा गाडीवाल्याचा सत्कार

केसरी वृत्तसेवा

कोल्हापूर : शासकीय विश्रामगृहाजवळच्या जानू झोरे या चहा गाडीवाल्याला सापडलेली पन्नास हजार रुपयांची रोकड असलेली बॅग प्रामाणिकपणे शाहूपुरी पोलिसांत जमा केल्याबद्दल पोलिसांनी झोरे यांचा सत्कार केला. पेठवडगाव येथील विजयंता दत्तात्रय सावंत या गुरुवारी कामानिमित्त कोल्हापूरात आल्या होत्या. त्या दुचाकीवरून जात असताना त्यांच्या जवळील ५० हजार रुपयांची रोकड असलेली बॅग शासकीय विश्रामगहाजवळ रस्त्यावर पडली होती. यावेळी त्या परिसरात असणारे चहा गाडीवाले जानू जयराम झोरे यांनी रस्त्यात सापडलेली बॅग प्रामाणिकपणे शाहूपुरी पोलिसात जमा केली. त्यानंतर विजयंता सावंत यांना शाहूपुरी पोलीस ठाण्यात बोलावून ५० हजाराची रोकड असलेली बॅग त्यांना परत करण्यात आली. शाहूपुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजय सिंदकर यांच्यासह पोलिसांनी झोरे यांचा सत्कार केला.

कागल ते पेठनाका महामार्गावरील नवीन कामांना शंभर कोटी मंजूर

केसरी वृत्तसेवा

कोल्हापूर : शेतकरी, शालेय विद्यार्थी व नागरिक यांनी खासदार धैर्यशील माने यांच्याकडे राष्ट्रीय महामार्गावरील भुयारी मार्गांची मागणी केली होती. यावेळी खासदार माने यांनी संबंधित रस्त्याची पाहणी विद्यार्थी, शेतकरी, नागरिक यांच्या समवेत केली होती. यावेळी सदर मागणी उचित असल्याचे सांगत संबंधित अधिकाऱ्यांना अहवाल सादर करण्याची सूचना त्यांनी दिली होती. दरम्यान, या कामासाठी त्यांनी देशाचे रस्ते व दळणवळण मंत्री नामदार नितीन गडकरी यांच्याकडे खासदार माने यांनी नवीन कामे समाविष्ट करण्याबाबत मागणी करून त्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. अखेर खासदार माने यांच्या पाठपुराव्याला यश मिळाले असून सदर राष्ट्रीय महामार्ग कागल ते पेठनाका दरम्यानच्या रस्त्यावर भुयारी मार्गाचे व सेवा रस्त्यांचे काम नव्याने समाविष्ट करून त्यासाठी शंभर कोटी रुपयांचा निधी मिळाला असल्याची माहिती खासदार धैर्यशील माने यांनी दिली.

धैर्यशील माने

जयसिंगपूर कॉलेजमध्ये विद्यापीठ जिल्हा युवा महोत्सवाचे आयोजन

केसरी वृत्तसेवा

जयसिंगपूर : शिवाजी विद्यापीठाचा ४४ वा एक दिवसीय जिल्हास्तरीय युवा महोत्सव शनिवार दि. २१ सप्टेंबर रोजी जयसिंगपूर कॉलेज येथे होत आहे. या महोत्सवात वैयक्तिक व सांघिक कला प्रकारांचे सादरीकरण केले जाणार आहे. यामध्ये लोकनृत्य, लोककला, मुकनाटय, लघु नाटिका, लोकसंगीत, एकल लोकवाद्य वादन, वादविवाद, मराठी, हिंदी व इंग्रजी वक्तृत्व, पथनाट्य, प्रश्नमंजुषा, एकांकिका अशा स्पर्धा होणार आहेत. स्पर्धेचे उद्घाटन ९.३० वा. डॉ.पी.एस.पाटील प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ यांच्याहस्ते आहे. याप्रसंगी प्र. संचालक डॉ. तानाजी चौगले, डॉ.आर.एच.अतिग्रे अध्यक्षस्थानी होते. संस्थेचे चेअरमन डॉ. सुभाष अडदंडे, सचिव डॉ. महावीर अक्कोळे, स्थानिक संयोजन समिती प्रमुख प्राचार्य डॉ. सुरत मांजरे, स्थानिक संयोजन सचिव डॉ. विजयमाला चौगुले उपस्थित राहणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. सुरत मांजरे यांनी दिली.

ज्ञानेश महाराव यांच्या विरोधात स्वामी भक्तांचा महामोर्चा, निदर्शने

महाराव यांना तात्काळ अटक करण्याची मागणी

केसरी वृत्तसेवा

कोल्हापूर : ठाणे-मुंबई येथे संभाजी ब्रिगेडचे अधिवेशन झाले. या अधिवेशनात ज्ञानेश महाराव यांनी प्रभू श्रीराम आणि श्री स्वामी समर्थ यांच्यावर टीका केली. या टीकेचा निषेध करत महाराव यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करत कोल्हापुरातील सर्व स्वामी समर्थ भक्ताक़डूंन शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. मोर्चामध्ये ५ हजार स्वामी भक्त सहभागी होते. महिला स्वामी भक्तही मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

ज्ञानेश महाराव यांनी संभाजी ब्रिगेडच्या अधिवेशनात प्रभू श्रीराम आणि स्वामी समर्थ यांच्यावर टीका केली. त्याचबरोबर त्यांनी अभिनेत्री निवेदिता जोशी सराफ यांच्याबद्दल देखील आक्षेपार्ह विधान केले. तसेच श्री संत गाडगे महाराज व संत श्री तुकाडोजी महाराज यांच्या कार्यावर सुध्दा आक्षेप घेतला. महाराव यांनी केलेल्या टीकेमुळं श्री स्वामी समर्थ भक्तांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष पसरला आहे. शुक्रवारी ऐतिहासिक दसरा चौकात सर्व स्वामी भक्तांच्यावतीने श्री स्वामी समर्थ महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर राजर्षी छत्रपती श्री शाहू महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करून मोर्चाला प्रारंभ करण्यात आला.

महाराव यांच्यावर कारवाईसाठी सर्व स्वामी समर्थ भक्ताक़डूंन जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. (छाया : मालोजी केरकर)

मोर्चामध्ये भजनी मंडळे, टाळ, मृदुंग, निषेधार्थ फलक, भगवे झेंडे, भगव्या टोप्या घालून भक्त सामील झाले होते. यावेळी भक्तांनी महाराव यांच्या विरोधात घोषण देवून विकृत प्रवृतीचा जाहीर निषेध केला. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर गेल्यानंतर आयोजकांनी जिल्हाधिकारी अमोल येडगे यांना महाराव यांच्यावर कारवाई करावी, या मागणीचे निवेदन खासदार धैर्यशील माने यांच्यासह स्वामी भक्तांच्या साक्षीने दिले.

वंदे भारत एक्सप्रेस मुंबईपर्यंत करून हातकणंगले थांबा द्यावा

दि इचलकरंजी पॉवरलुम असोसिएशनची मागणी

केसरी वृत्तसेवा

इचलकरंजी : वंदे भारत रेल्वेमार्ग कोल्हापूर ते मुंबई करण्याचे व वेळ पहाटे ५.३० करण्याचे निवेदन दि. इचलकरंजी पॉवरलुम असोसिएशनतर्फे केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव व केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री व्ही. सोमाण्णा यांना पाठविण्यात आले.

सदर निवेदनामध्ये, सोमवार दि. १६ सप्टेंबर पासून कोल्हापूर ते पुणे वंदे भारत रल्वे सुरू झाली. गतीशिल दळणवळणाचे साधन म्हणून या वंदे भारत रेल्वेकडे पाहिले जाते. परंतू ही रेल्वे कोल्हापूर ते पुणे ऐवजी कोल्हापूर ते मुंबई या मार्गावर धावणे कोल्हापूर, सांगली येथील उद्योग, व्यापार व पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत गरजेचे आहे. त्याचबरोबर या वंदे भारत रेल्वेची वेळ कोल्हापूर येथून सुटतानाची पहाटे ५.३० वाजताची असावी. जेणेकरून पुणे किंवा मुंबईमध्ये कार्यालयीन वेळेत प्रवाशांना पोहोचता येईल.

कोल्हापूर जिल्ह्यातील सर्वात मोठे औद्योगिक व व्यापारी शहर म्हणून इचलकरंजीची ओळख आहे. येथील व्यापारी, उद्योजक पूणे व मुंबई येथे व्यापाऱ्यांच्या निमित्ताने तसेच पुढील प्रवासासाठी रेल्वे अथवा विमान पकडण्यासाठी प्रवास करतात. त्यामुळे इचलकरंजीकरांच्या सोईसाठी हातकणंगले येथे २ मिनीटांचा थांबा देण्यात यावा. यामुळे इचलकरंजी व परिसरातील प्रवाशांना सोईचे होईल. तसेच या वंदे भारत रेल्वेचे प्रवास भाडे माफक असावे, असे निवेदनात नमुद केले आहे.

डीकेटीई म्हणजे उज्ज्वल करिअर : डॉ. सपना आवाडे

केसरी वृत्तसेवा

इचलकरंजी : जागतिक आव्हानांना तोंड देण्यासाठी अधिक प्रतिभाशाली अभियंत्यांची गरज आहे आणि असे सक्षम व गुणवत्तापूर्ण अभियंता बनविण्याचे सामर्थ्य डीकटीईमध्येच आहे, असे प्रतिपादन डीकेटीईच्या मानद सचिव डॉ. सपना आवाडे यांनी प्रथम वर्ष बी.टेक. टेक्स्टाईल व इंजिनिअरींग, डिप्लोमा व एमबीए विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभात केले.

घोरपडे नाटयगृह, इचलकरंजी येथे संपन्न झालेल्या या समारंभात डॉ. सपना आवाडे यांनी, डीकेटीई इन्स्टिटयूट ही जगभरात आदर्शवत इन्स्टिटयूट म्हणून ओळखली जाते, असे सांगत विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तम करिअरसाठी अनेक मंत्र सांगितले.

डीकेटीईचा इंजिनिअरींगच्या प्रथम वर्षामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभांत मार्गदर्शन करीत असताना डीकेटीईच्या मानद सचिव डॉ. सपना आवाडे.

संचालिका डॉ. एल. एस. आडमुठे यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेतला. डायरेक्टर डॉ. यु. जे. पाटील यांनी विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या आंतरराष्ट्रीय यशाबद्दल माहिती सांगितली. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रा. आर. के. वळसंग यांनी आभार मानले. सुत्रसंचालन प्रा. प्रतिमा चौगुले यांनी केले.

मल्हारपेठ : भाजपा पन्हाळा तालुका कार्यकारणी बैठकीत मार्गदर्शन करताना भाजपचे जिल्हाध्यक्ष नाथाजी पाटील.

करवीर विधानसभा मतदारसंघ भाजपाला मिळावा : नाथाजी पाटील

भाजपा पन्हाळा तालुका पदाधिकाऱ्यांशी संवाद

केसरी वृत्तसेवा

पन्हाळा : पश्चिम पन्हाळा भाजप कार्यकर्त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहून त्यांची ताकद वाढविण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन नूतन भारतीय जनता पार्टी ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष नाथाजी पाटील यांनी केले.

ते मल्हारपेठ (ता.पन्हाळा) येथे कार्यालयात पश्चिम पन्हाळा दौऱ्याप्रसंगी भाजप पदाधिकाऱ्यांशी संवाद साधताना बोलत होते. करवीर विधानसभा मतदारसंघ हा भाजपला मिळावा असा आग्रह कार्यकर्त्यांनी धरला असून याबाबतचा अहवाल मंत्री चंद्रकांत पाटील व खासदार धनंजय महाडिक यांच्याकडे लवकरच पाठवणार असल्याचेही त्यांनी सांगितले. जिल्हाध्यक्ष नाथाजी पाटील म्हणाले, भाजपाने वेगवेगळ्या पद्धतीच्या सर्वसामान्यांच्यासाठी योजना सुरू केल्या असून सर्व योजना शेवटपर्यंत चालू राहतील त्यासाठी शासनाने त्याची आर्थिक तरतूद करून ठेवली आहे. योजना बंद पडतील, असे विरोधकांनी वावड्या उठवण्याचा प्रयत्न जो केला आहे, तो प्रयत्न येथे निवडणुकीमध्येच जनता हाणून पाडेल.

करवीर विधानसभा मतदारसंघाची उमेदवारी महायुतीतून भाजपाला मिळावी असा ठराव भाजपा पन्हाळा तालुका कार्यकारणी बैठकीत एकमताने करण्यात आला. पत्रकारांसाठी कल्याणकारी महामंडळ व्हावे यासाठी आम्ही सर्वजण मुख्यमंत्री यांना निवेदन देणार असल्याचे पन्हाळा तालुकाध्यक्ष मंदार परीतकर यांनी यावेळी बोलताना सांगितले.

युवा स्टेशनरीतर्फे 'माय बाप्पा आर्ट वर्कशॉप्स'चे आयोजन

केसरी वृत्तसेवा

कोल्हापूर : नवनीतच्या यूवा स्टेशनरीतर्फे कोल्हापूरमध्ये 'माय बाप्पा आर्ट वर्कशॉप्स' चे आयोजन केले होते. सप्टेंबर महिन्यातील पहिल्या आठवड्यात विमला गोएंका इंग्लिश मीडियम स्कूल, श्री दत्तपाळ विद्यामंदिर, राजर्षी छत्रपती शाहू महाराज हायस्कूल अँड ज्यु. कॉलेज, सेंट झेव्हियर्स हायस्कूल, श्री वसंतराव जयवंतराव देशमुख इंग्लिश स्कूल आणि श्री वसंतराव जयवंतराव देशमुख हायस्कूल अँड ज्यु. कॉलेज या शाळांमध्ये कार्यशाळा आयोजित केल्या. प्रख्यात कलाकार मिलिंद देसाई यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली हजारो विद्यार्थ्यांनी या कार्यशाळांमध्ये सहभाग घेतला आणि गणपतीचे त्यांच्या मनातील रूप साकारले. या प्रसंगी यूवाचे चीफ स्ट्रॅटजी ऑफिसर अभिजीत सान्याल म्हणाले, लहान मुलांमधील कल्पकतेला चालना देणे आणि गणेशोत्सव साजरा करण्यासाठी एक अर्थपूर्ण मार्ग दाखवणे ही या कार्यशाळांची उद्दिष्टे होती.

निरंतर स्वच्छतेसाठी सर्व गावांनी प्रयत्न करावेत

कार्तिकेयन एस.

केसरी वृत्तसेवा

कोल्हापूर : स्वच्छता ही सेवा हा केवळ पंधरवडा म्हणुन साजरा न करता जिल्ह्यातील सर्व गावांनी आणि नागरिकांनी शाश्वत आणि निरंतर स्वच्छतेसाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हा परिषदेचे प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी एस. कार्तिकेयन यांनी केले.

स्वच्छता ही सेवा मोहिम दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. या कालावधीत स्वच्छतेमध्ये लोकसहभाग आणि लोकचळवळ निर्माण करण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. यासाठी जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये एक दिवस माझ्या गावाच्या स्वच्छतेसाठी - महाश्रमदान उपक्रम आयोजित केला होता. ग्रामपंचायत उजळाईवाडी (ता. करवीर) येथे या उपक्रमाचा शुभारंभ मुख्य कार्यकारी अधिकारी एस.कार्तिकेयन यांच्या हस्ते झाला. यावेळी उजळाईवाडी सरपंच उत्तम अंबवडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कोल्हापूर : स्वच्छता पंधरवडा निमित्त स्वच्छता प्रतिज्ञा घेण्यात आली.

स्वच्छता ही सेवा या मोहिमेंतर्गत स्वच्छतेत लोकसहभाग वाढविणे, जनजागृती करणे, गावातील कचरा असणारी ठिकाणांची स्वच्छता करणे, तसेच गावातील सार्वजनिक ठिकाणे, बाजारपेठा, शासकीय इमारती, धार्मिक स्थळे, पर्यटन स्थळे यासारख्या ठिकाणी ही स्वच्छता मोहिम राबविण्यात येणार आहे. याशिवाय एस. कार्तिकेयन यांच्या मार्गदर्शनाखाली या पंधरवड्यात विशेष उपक्रम राबविले जाणार असल्याची माहिती यावेळी जिल्हा समन्वयक तथा प्रकल्प संचालक माधुरी परीट यांनी यावेळी दिली.

एक दिवस माझ्या गावाच्या स्वच्छतेसाठी या महाश्रमदान उपक्रमात ग्रामपंचायत उजळाईवाडी येथे विविध उपक्रम राबविण्यात आले. गावची स्वच्छता करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. शाळेच्या परिसरामध्ये मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तसेच गावातील सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता श्रमदान मोहीम राबविण्यात आली.

एल&टी फायनान्स लिमिटेड
(आधीचे नाव, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
नोंदणीकृत कार्यालय: एल&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
CIN No.: L67120MH2008PLC181833
शाखा कार्यालय: कोल्हापूर

L&T Finance

गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी सार्वजनिक लिलाव

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 [54 ऑफ 2002] आणि या कायद्यांतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा लिलाव करत आहे. **"आधार कुठे आहे" आणि "जशी स्थिती आहे तशी"** त्याची देय रक्कम आणि पुढील व्याज, शुल्क आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **"सार्वजनिक लिलाव"** च्या मार्गाने.

कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 20.09.2024 नुसार	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1. संदीप सखाराम पोवळकर. 2. सुप्रिया संदीप पोवळकर	मालमत्तेच्या पत्त्याचा सर्व तुकडा आणि पार्सल: रु. 241/8, प्लॉट क्रमांक B-12 युनिट क्रमांक 1, 154 आरसीसी 169.46 चौ. मीटर बांधकामावर स्थित, ज्यात युनिट क्रमांक 1 मधून चौ.मी. 90.65 चौ.मी. आणि आरसीसी बांधकाम 94.36 चौ.मी. असलेली, निवासी मालमत्ता, कोल्हापूर महानगरपालिका 'A' प्रभाग, फुलेवाडी रिंगच्या रोड, बालिंदे कोल्हापूर, महाराष्ट्र 416011 हद्दीत स्थित आहे. सीमा: पूर्व - नौकुडाकरचे युनिट क्र 2; पश्चिम - कॉलनी रोड; उत्तर - कॉलनी रोड; दक्षिण - प्लॉट क्रमांक 11 बी	H15467290519025024, H15467290519025024G, H15467290519025024L, H15467290519025024T	28.08.2024	रु. 3,57,147/-	रु. 31,16,042.43/-	रु. 35,71,479.00/-	सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी 10.00 ते संध्याकाळी5.30 पर्यंत नियोजित भेटी सह.	25/10/2024 रोजी दुपारी 12.00 ते 2.00 पर्यंत

सावजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.auctiontiger.net/EPROC/ वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **24/10/2024** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या **10%** परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी **25%** रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **25/10/2024** रोजी **18:00** पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **26/10/2024** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या **75%** रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेची तपासणी करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात जसे की **नाव - श्री शेखर काळे, संपर्क क्रमांक 9823271111, एल&टी फायनान्स लिमिटेड, 3रा मजला, कार्यालय क्रमांक 301 आणि 302, जेनिथ कॉम्प्लेक्स, के बी जोशी पथ, शिवाजी नगर, पुणे 411005 आणि श्री संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, एल&टी फायनान्स लिमिटेड, ऑफिस: 6 वा मजला, वृंदावन बिल्डिंग, प्लॉट नंबर 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व - 0 मुंबई), 400 098.** ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता आणि कोणतीही पूर्वसूचना न देता बोली/ऑफर स्वीकार/नाकारू/सुधारू/रद्द करू शकतो किंवा ई-लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करून घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

दिनांक: 21.09.2024
ठिकाण: कोल्हापूर

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड